3 ऱ्या वर्षात यशस्वी पदार्पण
आमच्यासोबत आपला प्रवास सुखाचा होईल..
विराज ट्रॅव्हल्स
प्रवाशांच्या सहकार्यामुळे विराज ट्रॅव्हल्सची यशस्वी वाटचाल,
सर्व ग्राहकांचे आभार!
पंकज गुंदेचा 9822496664 9403448649

दैनिक
मनोरंजनासह प्रबोधनासाठी...
epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

ईश्वर टी अँण्ड नाष्टा सेंटर
संपुर्ण महाराष्ट्रातील खवैयांची आवडती चव सावेडी उपनगरातील प्रेमदानचौकात
पोहे, समोसा, शाबुदाणा खिचडी
प्रो.प्रा. ईश्वर जायभाय- 70583 88547
प्रेमदानचौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ३०७ वा ● गुरुवार, ता. १५ मे २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००



भारताचे ५२ वे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती भूषण गवई यांना प्रेसिडेंट ऑफ इंडिया द्रोपदी मुर्मू यांनी शपथ दिली. ते महाराष्ट्रासाठी 'भूषण' आहे. त्यांच्या कारकीर्दीत भारतीय न्यायव्यवस्था अधिक सुदृढ, विश्वासार्ह आणि लोकाभिमुख होईल, असा विश्वास व्यक्त होत आहे.

# महाराष्ट्रापेक्षा सुद्धा आज गुजरात पुढे आहे- शरद पवार

## तेथील सहकारी संस्था या अधिक शक्तिशाली

**मुंबई । प्रतिनिधी**

सहकाराबद्दल नेहमी बोललं जातं की महाराष्ट्र, गुजरात, केरळ आणि तामिळनाडू या चार राज्यांमध्ये सहकारी संस्थांची अवस्था चांगली आहे. पण तुलनात्मक आपण माहिती जर घेतली तर महाराष्ट्रापेक्षा सुद्धा आज गुजरात पुढे आहे. गुजरातच्या सहकारी संस्था या अधिक शक्तिशाली आहेत. तुम्ही दुधाच्या क्षेत्रात बघा किंवा अन्य सहकारी क्षेत्रात बघा, कापसाच्या क्षेत्रात बघा. साखर कारखाने हे मर्यादित आहेत. पण त्याचं आरोग्य तुम्ही बघा, गुजरात हे महाराष्ट्राच्या पुढे गेलेलं आहे, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी केले. दख्खनचा उठाव आणि सहकारात मुहूर्तमेढ १२ मे १८७५ ते १२ मे २०२५ शतकोत्तर सुवर्ण स्मृतिदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात पवार बोलत होते.



यावेळी पवार म्हणाले, कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर आणि सहकारी क्षेत्रात अनेक वर्ष काम करणारे व विविध जिल्ह्यातून आलेले माझे सगळे सहकारी बंधू-भगिनींनो... आजचा दिवस एक आगळावेगळा असा दिवस आहे. दीडशे वर्षांपूर्वी दख्खनचा उठाव म्हणून एक संघर्ष महाराष्ट्रामध्ये झाला होता. हा झाला कुठे? एक दुष्काळी गाव आहे, दुष्काळी परिसर आहे, त्या परिसरामध्ये झाला. कशासाठी झाला? तर कष्टकरी शेतकऱ्यांनी कर्ज घेतलं होतं. व्याजावर व्याज वाढवलं गेलं, चक्रवाढ व्याजापेक्षासुद्धा जादा रक्कम वसूल करण्याची खबरदारी घेतली गेली. शेवटी शेतकरी संघटित झाले, त्यांना ज्या नोटिसा आल्या होत्या, पुस्तकं जी होती कर्जाची त्यांनी जाळून टाकली. हा संघर्ष व हा लढा त्या दिवशी केलेला होता. पण या संघर्षामुळे एक चांगली गोष्ट झाली. त्यावेळच्या इंग्रज सरकारला शेतकऱ्यांचं हे दुखणं समजलं. सावकारी व्यवस्थेला पर्याय म्हणून काही यंत्रणा केली पाहिजे, त्यासाठी सरकारी वित्तीय योजना याची स्थापना झाली. पूर्वीच्या काळामध्ये शेतकऱ्यांना कर्जासाठी फक्त सावकार आणि व्यापारी हे दोनच घटक उपलब्ध होते. त्याऐवजी सावकारांच्या मनमानी कारभारावर नियंत्रण ठेवणाऱ्या सहकारी संस्थेची स्थापना ही त्यातून झालेली होती.

दख्खनचा जो उठाव झाला, त्यानंतर इंग्रज सरकारने डेक्कन रॉईट्स कमिशन नावाचं एक कमिशन नेमलं. त्या कमिशनच्या शिफारसीनुसार एग्रीकल्चर रिलीफ अॅक्ट १८७९ अस्तित्वात आला. त्याच वेळेला खऱ्या अर्थाने राज्य सहकारी बँक काढावी, असा विचार पुढे आला. पण या विचाराच्या त्या प्रस्तावाला सहकारच्याच सचिवांनी विरोध केला आणि त्यामुळे ती बँक काही होऊ शकली नाही. आज ज्या राज्य सहकारी बँकेने हा कार्यक्रम आयोजित केला, त्या राज्य सहकारी बँकेचे संस्थापक स्व. विठ्ठलदास ठाकरसी यांनी १९०६ साली मुंबईला - या नावाने संस्था सुरू केली. त्याचं आज या सहकारी बँकेत रुपांतर झालं. या बँकेने सुरुवातीच्या काळामध्ये प्राथमिक सोसायट्या ज्या आहेत, त्यांच्यामार्फत शेतकऱ्यांना कर्ज पुरवलं. राज्य सहकारी बँकेने शताब्दीचा जो कार्यक्रम केला होता, त्यामध्ये एक प्रकाशन केलेलं होतं. ते प्रकाशन सबंध इतिहास देणारं होतं. मला आठवतंय ते वाचल्यानंतर राज्य सहकारी बँकेने शेतकरी आणि व्यापाऱ्यांसाठी अनेक कर्ज योजना ज्या सुरू केल्या, त्या आजही चालू आहेत. त्यावेळेला शेतकऱ्यांनी तयार केलेल्या मालाच्या विक्रीसाठी स्वतंत्र व्यवस्था सहकाराच्या मार्फत नव्हती. त्यामुळे शेतकऱ्याला त्याच्या कष्टाची किंमत नीट मिळत नव्हती. त्याच वेळेला साखर कारखानदारी नव्हती, गुळाचा धंदा होता. त्या गुळाच्या धंद्यामध्ये एक व्यापारी जास्तीत जास्त गुळाची खरेदी करायचा आणि मार्केटवर त्याचं नियंत्रण असायचं. म्हणून राज्य सहकारी बँकेचे अध्यक्ष होते विठ्ठलदास ठाकरसी. त्यांनी काही व्यापाऱ्यांना अल्प कर्ज दिलं आणि त्यांना खरेदीसाठी उभं केलं. स्पर्धा वाढवली व दोन पैसे शेतकऱ्यांना अधिक येण्याची व्यवस्था त्यांनी केली. याच्यातून सहकारी संस्थेची आवश्यकता हा विचार लोकांच्या मनामध्ये गेला

( पान २ वर)

# भाजपा मंत्री शहा विरूध्द एफआयआर दाखल करा- हायकोर्ट

**जबलपूर । प्रतिनिधी**

रा.स्व.संघ भाजपा नेता आणि मध्यप्रदेशचा मंत्री विजय शहा याने



ऑपरेशन सिंदूरची माहिती देणाऱ्या कर्नल सोफियाकुरेशी यांच्याविरुद्ध आक्षेपार्ह विधान केले. त्या दहशतवाद्यांच्या बहिण आहेत असे विकृत वक्तव्य केले होते. त्याच्या या देशद्रोही विधानानंतर विरोधकांकडून बडतर्फ करण्याची मागणी केली जात आहे.

दरम्यान जबलपूर हायकोर्टाने त्याच्याविरुद्ध तातडीने दाखल करण्याचा आदेश दिला.



# पंढरपुरचे गणेश आटकळे पलपब साहित्यभूषण पुरस्काराने सन्मानित

**सातारा । प्रतिनिधी**

येथील कोडोलीमधे अजिंक्य साहित्यसंगम राज्यस्तरीय साहित्य संमेलन व पुरस्कार सोहळा रविवारी ता.११ मे रोजी पार पडला. यावेळी पंढरपुरचे लेखक गणेश आटकळे यांना गुजरातमधील अहमदाबाद येथील पलपब प्रकाशन संस्थेकडून साहित्यभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

यावेळी ज्येष्ठ लेखक अनिल बोधे, लेखक सुरेश शिंगटे, कवी हनुमंत चांदगुडे, ज्येष्ठ साहित्यिक गणपतराव कणसे, विजय वेटम, प्रतिक मतकर, पलपब साहित्य संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी लीना पाटील, ज्येष्ठ साहित्यिका अनिता नलगे तसेच महाराष्ट्र अध्यक्ष किरण तोडकर, संदीप पवार, रेखा दीक्षित आदी साहित्यिक उपस्थित होते.साहित्यिकांनी आटकळे यांच्या शोधक पुस्तकाबद्दल आपल्या भावना मांडल्या. या काव्यसंग्रहानिमित्त त्यांचा हा सन्मान करण्यात आला आहे.

# कर्नल सोफिया कुरेशी आणि आयडिया ऑफ इंडिया

भारत हा एक सेक्युलर देश आहे आणि भारतीय लष्कर भारताच्या घटनात्मक मूल्यांचे एक सुंदर उदाहरण आहे कर्नल सोफिया कुरेशी यांच्या, आजच्या काळोखलेल्या दिवसात, चमकणाऱ्या विजेसारखा लख्ख उजेड पाडणाऱ्या या उद्गारांच्या निमित्ताने. १९४७ साली आपल्या देशाने ब्रिटिशांपासून राजकीय स्वातंत्र्य मिळवले खरे. पण शेवटी देश ही एक संकल्पना असते. ती संकल्पना जीव, मांस, रक्तपेशी, बळकट हाडे घालून उभी करायची असते. मुख्य म्हणजे पिढी दरपिढी टिकवायची असते. आयडिया ऑफ इंडिया प्रत्यक्षात येण्याच्या अतिशय गुंतागुंतीच्या आणि अनेक दशके चालणाऱ्या या प्रक्रियेत खालील सर्व उपक्रमांनी भरीव योगदान दिलेले आहे. लष्कर, हवाई दल, नाविक दल, सीमा सुरक्षा दलासारखी निमलष्करी दले, संरक्षण साहित्य निर्मिती कंपन्या, केंद्र सरकारने स्थापन केलेल्या संशोधन संस्था, इस्रो, अनुसंधान, डी.आर.डी.ओ, भारतीय प्रशासकीय सेवा, परराष्ट्र सेवा, भारतीय डाक, भारतीय रेल्वे, पोर्ट ट्रस्ट, भारतीय न्यायसंस्था, रिझर्व बँक, सेबीसारखी नियामक मंडळे, प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कर संचनालय, खूप मोठी यादी होईल. आणि त्याशिवाय केंद्र सरकारचे अनेकानेक व्यापारी उपक्रम. भारतीय रस्ते महामंडळ आणि अनेक महामंडळे, सार्वजनिक बँका विमा कंपन्या, वीजनिर्मिती क्षेत्रातील एन.टी.पी.सी., एन.एच.पी.सी., तेल आणि पोलाद कंपन्या, खूप मोठी यादी होईल. या सर्व संस्था, उपक्रमांचे देशपातळीवर अधिकाऱ्यांचे केडर असते, यातील अधिकाऱ्यांची भरती देशपातळीवर होते. कार्यकाळात त्यांची बदली आणि नेमणूक भारतात कोठेही होत असते. या सर्व उपक्रमांमध्ये घटनात्मक जाती आधारित आरक्षण लागू आहे. देशातील अर्ध्या नागरिकांना मिळालेल्या या विश्वासामुळे देशात सामाजिक आणि राजकीय स्थैर्य स्थापन होण्यास हातभार लागला आहे. त्यांच्या कुटुंबातील पुढच्या पिढ्या तर अनेक क्षेत्रात नेत्रदीपक योगदान करू लागल्या आहेत. (खासगीवाले हे सारे वाचून न वाचल्यासारखं करतील. त्यांना जाऊद्या.) हे अधिकारी फक्त नोकरीत असताना आपल्या कुटुंबासह जन्मगावापासून दूर राहत नाहीत तर त्यातील अनेक निवृत्तीनंतर देखील पूर्णपणे भिन्न प्रांतात कायमचे स्थायिक होत असतात. तेथील सामाजिक सांस्कृतिक जीवनात एकरूप होत असतात. या अभिसरणामुळे कप्पे बंद भारतीय समाजातील कप्पे मोडून अतिशय तरलपणे देशातील सामाजिक, भाषिक, सांस्कृतिक अभिसरणाची प्रक्रिया गतिमान झाली आहे. आयडिया ऑफ इंडिया दैनंदिन जीवनाचा भाग झाली की, ती आयडिया व्यक्तीच्या, कुटुंबाच्या डीएनएचा देखील भाग होते. शब्दांवरचे अवलंबित्व कमी होते. सार्वजनिक विरुद्ध खासगी अशी बुद्धीभेदी मांडणी करणाऱ्या, नफा फक्त रुपयात मोजू शकणाऱ्या लोकांच्या मेंदूत हे बिगर वित्तीय आयाम रुजू शकत नाहीत. त्यांची ती कुवत देखील नाही. ही संकुचित विचारांची लोक मूठभर असली तरी राजकीयदृष्ट्या प्रचंड ताकदवर आहेत. कोणास माहीत उद्या एखाद्या भारतीय एलोन मस्कच्या हातात सारखी एखादी करवत दिली जाईल, आणि जे जे सार्वजनिक त्यावर चालवली जाईल. नो जोक्स ! देशातील सामान्य जनता जशी विचारी होत जाईल, त्याप्रमाणात या मूठभर लोकांची सार्वजनिक विचारविश्वावरची, राजकीय/आर्थिक धोरणांवरची पकड ढिली व्हायला लागेल. ज्याची नितांत तातडी आहे.



संजीव चांदोरकर

-----------

**देशसंवाद**




# मनोविकासच्या ग्रंथांना मसाप पुरस्कार २०२५ जाहीर

**पुणे । प्रतिनिधी**

येथील मनोविकास प्रकाशनच्या ग्रंथांना महाराष्ट्र साहित्य परिषदेचे २०२५ सालचे पुरस्कार जाहीर झाले. हा केवळ लेखकांचा नव्हे तर सामाजिक भान, भाषिक समृद्धी आणि वैचारिक चिकित्सेचा हा गौरव आहे. पुरस्कृत ग्रंथ व लेखक - संघ समजून घेताना दत्तप्रसाद दाभोळकर, भिंतीआडचा चीन श्रीराम कुंटे, काळीजखुणा सदानंद कदम, भारतीय भाषांची अनोखी कहाणी पेगी मोहन अनुवाद: मेघना भुस्कुटे या प्रतिभावंत लेखकांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# बेकायदेशीर रस्ता रुंदीकरणाविरोधात तब्बल १०० शेतकऱ्यांची उच्च न्यायालयात धाव

**गंगापूर । प्रतिनिधी**

बेकायदेशीर रस्ता रुंदीकरणाविरोधात तब्बल १०० शेतकऱ्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात धाव घेतली. प्राथमिक सुनावणीत न्या. मंगेश एस पाटील आणि न्या. वाय जी. खोब्रागडे यांनी महसूल व सार्वजनिक बांधकाम विभागांचे सचिव, जिल्हाधिकारी तसेच प्रतिवादींना नोटीस बजावण्याचे आदेश दिले आहेत. गंगापूर तालुक्यातील माळीवाडा ते आंबेलोहळ व शिरोडी ते काटेपिंपळगाव या रस्त्याच्या दुतर्फा प्रत्येकी सुमारे पन्नास फुट एवढे रुंदीकरणाचे काम सुरू करण्यात आलेले आहे. या रस्त्याच्या रुंदीकरणामुळे येथील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. जमिनीचा योग्य मोबदला दिल्याशिवाय काम करू देणार नाही, अशी खमकी भूमिका शेतकऱ्यांनी घेतली.

# तिसऱ्या भाषेला सक्त विरोध; मराठी अभ्यास केंद्राच्या सभेत एकमताने ठराव



**मुंबई । प्रतिनिधी**

शासनाने इयत्ता पहिली ते पाचवी त्रिभाषा सूत्र लागू करू नये, असा ठराव अभ्यासक, राजकीय प्रतिनिधी व कार्यकर्ते यांनी एकमताने केला. तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये पहिलीपासून त्रिभाषा सूत्राचा उल्लेख असो किंवा नसो, बालकांचे मानसशास्त्र व मेंदूशास्त्र यांचा विचार करता, पहिली ते पाचवी त्रिभाषा सूत्र लागू करू नये, असे स्पष्ट मत अभ्यासकांनी मांडले. त्यांच्या या मताला राजकीय प्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते व उपस्थित प्रेक्षक यांनी एकमताने पाठिंबा दिला. मराठी अभ्यास केंद्राने पहिलीपासून तिसऱ्या भाषेविरुद्ध, पहिलीच्या हिंदी पाठ्यपुस्तक छपाई विरोधात आणि महाराष्ट्रावरील हिंदीच्या आक्रमणाविरोधात ता. ११ मे रोजी आयोजित केलेल्या सभेत मान्यवरांनी हा ठराव केला.सभेमध्ये बालशिक्षण क्षेत्रातील रमेश पानसे, गिरीश सामंत, भाषाभ्यासक डॉ. प्रकाश परब, राजकीय प्रतिनिधी माजी उद्योग व भाषा मंत्री सुभाष देसाई, खासदार अरविंद सांवत (शिवसेना - उबाठा), धनंजय शिंदे (काँग्रेस), अजित अभ्यंकर (मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष), हेमंतकुमार कांबळे पांगीरकर (मनसे), प्रभाकर नारकर (जनता दल) उपस्थित होते. मराठी शाळांच्या सदिच्छादूत चिन्मयी सुमीत याही उपस्थित होत्या. यावेळी मराठी अभ्यास केंद्राचे संस्थापक सदस्य आणि भाषाभ्यासक डॉ. प्रकाश परब यांनी म्हटले, हिंदी सक्तीला विरोध झाल्यावर, हिंदी अनिवार्य नसेल असे मानभावीपणे सांगणे ही मराठी भाषकांची दुहेरी फसवणूक आहे. कोणतेही वैध कारण नसताना मुलांना पहिलीपासून तिसरी भाषा शिकवणे आणि तीही परिस्थितिजन्य कारणांमुळे हिंदीच असेल, हे राज्य सरकारचे धोरण म्हणजे महाराष्ट्रद्रोह आहे. शिक्षण-अभ्यासक गिरीश सामंत यांनी मत व्यक्त केले की, प्राथमिक शाळेत एकच शिक्षक मराठी, इंग्रजी व इतर विषयही शिकवतो. आता त्यात तिसरी भाषा शिकवण्याचेही शिक्षकांवर ओझे पडेल, त्याचा परिणाम त्यांच्या शिकवण्यावर झाल्यावर राहणार नाही. तसेच तिसरी भाषा लागू करायच्या आधी त्याचा अभ्यास करणे अपेक्षित असताना, सरकार शासननिर्णय काढल्यावर अभ्यास समिती नेमते. ही सरकारची उलटी गंगा आहे. लहान वयात तीन-चार भाषा शिकता येतात, असा अनेकांचा गैरसमज आहे. लहान मूल तीन-चार भाषा शिकू शकते, मात्र त्या भाषा त्याच्या परिसरात असाव्या लागतात, असे बालशिक्षण-तज्ज्ञ रमेश पानसे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले. माजी उद्योगमंत्री सुभाष देसाई (शिवसेना उबाठा पक्ष) यांनी आमच्या सरकारने सर्व शाळांमध्ये मराठी शिकवण्याचा कायदा अनिवार्य केला, मात्र नव्या सरकारने गेली तीन वर्षे तो का अमलात आणला नाही, असा प्रश्न उपस्थित केला.

# समाजकार्य पदवीधरांसाठी नोकरीच्या वाढत्या संधी- डॉ. सुरेश पठारे

## सीएसआरडी समाजकार्य महाविद्यालयात कॅम्पस रिक्रुटमेंट, १४ नामांकित संस्थांचा सहभाग

**अहमदनगर । प्रतिनिधी**

बीपीएचई सोसायटीचे सीएसआरडी सामाजकार्य व संशोधन संस्थेमार्फत एमएसडब्ल्यूच्या द्वितीय वर्षाची परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांसाठी कॅम्पस रिक्रुटमेंटचे आयोजन करण्यात आले होते. या कॅम्पस रिक्रुटमेंटमध्ये सहभागी झालेल्या संस्थांमध्ये सामाजिक, आरोग्य, शिक्षण, बालकल्याण, मानवी तस्करीविरोधी कार्य, कौशल्य विकास व प्रशिक्षण या विविध क्षेत्रातील आघाडीच्या १४ नामांकित संस्थांनी सहभाग नोंदवून एमएसडब्ल्यूच्या ८० विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून दिल्या. एप्रिल व मे महिन्यात चार टप्प्यामध्ये पार पडलेल्या या कॅम्पस रिक्रुटमेंट प्रक्रियेत प्रामुख्याने मुंबई येथील कौशल्य विकासासाठी कार्यरत असणारे एडूस्पार्क एमआयडीसी कौशल्य विकास केंद्र, बंगलूरू येथील अजीम प्रेमजी फाउंडेशन, शिक्षण व पोषण क्षेत्रात कार्यरत असणारे ब्रिटानिया न्युट्रीशन फाउंडेशन पुणे, मुंबई येथील आरोग्य व शिक्षण क्षेत्रात कार्यरत असणारे समता फाउंडेशन, पुणे येथील शिक्षण क्षेत्रात कार्यरत असणारे लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट, मानवी तस्करी रेसक्यु व पुनर्वसन क्षेत्रात कार्यरत असणारे फ्रीडम फर्म, छत्रपती संभाजीनगर येथील शिक्षण क्षेत्रात कार्यरत असणारे रॉकेट लर्निंग,




अहिल्यानगर येथील संकल्प प्रतिष्टानचे सावली बालगृह, पुणे येथील अक्षर भारती सेवा इंटरनॅशनल, पद्मश्री विखे पाटील हॉस्पिटल अहिल्यानगर, अशा नामांकित संस्थां प्रतिनिधीनी प्रत्यक्ष हजर राहून विद्यार्थ्यांची निवड केली. यासोबतच आदिवासी विकास क्षेत्रात कार्यरत असणारे रायगड मुंबई येथील स्वदेश फाउंडेशन, पुणे येथील शिक्षण व कौशल्य विकासासाठी कार्यरत असणारी मॅजीक बस या संस्था कॅम्पस रिक्रुटमेंटच्या पुढील टप्प्यात सहभागी होणार आहेत अशी माहिती सीएसआरडीचे संचालक डॉ. सुरेश पठारे यांनी दिली. कॅम्पस रिक्रुटमेंटपूर्वी प्रत्येक संस्थेच्या प्रतिनिधींनी आपल्या संस्थेची ओळख व उपलब्ध रिक्त पदांची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना दिली. विद्यार्थ्यांनी विविध संस्था प्रतिनिधींशी थेट संवाद साधला. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना तत्काळ नियुक्ती पत्र देण्यात येणार असल्याचे संस्थांचे अधिकारी यांनी सांगितले. प्लेसमेंट प्रमुख वैशाली पठारे यांच्या मार्गदर्शनाखाली प्लेसमेंट विभागाने विद्यार्थ्यांसाठी मुलाखत तंत्र प्रशिक्षण, सॉफ्ट स्किल डेव्हलपमेंट, सीव्ही तयार करण्यासाठी कार्यशाळा, मॉक इंटरव्ह्यू असे विविध उपक्रम राबवले होते. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होवून, प्रभावी सादरीकरण कौशल्य विकसित झाले, आणि करिअरच्या दृष्टीने योग्य दिशा मिळवणे शक्य झाले. विद्यार्थ्यांनी या संधीचा पुरेपूर लाभ घेत निवड प्रक्रियेत आत्मविश्वासाने सहभाग घेतला. यावेळी डॉ. पठारे म्हणाले, विद्यार्थ्यांना केवळ नोकरी मिळवून देणे हा उद्देश नसून, त्यांना समाजकार्याच्या विविध क्षेत्रांमध्ये योगदान देण्यासाठी प्रभावी व्यासपीठ उपलब्ध करणे हे संस्थेचे ध्येय आहे. त्यामुळे त्यांना करिअरसाठी चांगल्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी नेहमीच प्रयत्न केला जातो. समाजकार्य पदवीधरांसाठी नोकरीच्या वाढत्या संधी असून या कॅम्पस रिक्रुटमेंटच्या माध्यमातून १०० टक्के प्लेसमेंट मिळू शकेल असे पठारे यांनी सांगितले. यावेळी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचे व संस्थांचे आभार मानत कॅम्पस रिक्रुटमेंटमुळे सामाजिक क्षेत्रातील आघाडीच्या संस्थांमध्ये काम करण्याची संधी मिळत असल्याने समाधान व्यक्त केले. प्लेसमेंट विभागाने दिलेले प्रशिक्षण आत्मविश्वासवृद्धीस उपयुक्त ठरले असा अभिप्राय त्यांनी आवर्जून दिला. कॅम्पस रिक्रुटमेंटच्या विविध संत्राचे सूत्रसंचलन सॅम्युअल वाघमारे यांनी केले तर सदर कॅम्पस रिक्रुटमेंट यशस्वी करण्यासाठी महाविद्यालायचे प्राध्यापक, कर्मचारी व प्लेसमेंट विभागाचे विदयार्थी प्रतिनिधी यांनी परिश्रम घेतले.



# ऑटो व इंजीनियरिंग क्लस्टरमुळे कौशल्य विकासाला चालना- विनायक देशमुख

**अहमदनगर । प्रतिनिधी**

एमआयडीसीतील ऑटो व इंजीनियरिंग क्लस्टरमुळे कौशल्य विकास कार्यक्रमाला चालना मिळेल, असा विश्वास कौशल्य विकास समितीचे सदस्य विनायक देशमुख यांनी व्यक्त केला. देशमुख यांनी एमआयडीसीतील ऑटो व इंजीनियरिंग क्लस्टरला भेट देऊन तेथील प्रशिक्षण सुविधांची पाहणी केली. यावेळी देशमुख यांच्या समवेत जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक संतोष गवळी, कौशल्य विकास विभागाचे सहाय्यक आयुक्त निशांत सूर्यवंशी, आमी कारखानदार संघटनेचे अध्यक्ष जयद्रथ खाकाळ उपस्थित होते. यावेळी क्लस्टरचे अध्यक्ष दौलत जानकू शिंदे यांनी देशमुख यांचे स्वागत केले. पुढे बोलताना देशमुख म्हणाले, ऑटो व इंजीनियरिंग क्लस्टरमुळे आपल्य एमआयडीसीमध्ये प्रशिक्षणाची अद्ययावत सुविधा उपलब्ध झाली. केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध प्रशिक्षण कार्यक्रमाची या क्लस्टरशी सांगड घातल्यास जिल्ह्यातील उद्योग आस्थापनांसाठी मोठे प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण होण्यास मदत होईल. अनेक बेरोजगार युवकांना रोजगार उपलब्ध होईल. सध्या उद्योग खात्याच्या सचिव पदाचा कार्यभार अहिल्यानगरचे माजी जिल्हाधिकारी डॉ.पी. अन्बल्गन यांच्याकडे आहे. एमआयडीसीतील अनेक प्लॉटचा कायदेशीर गुंता बऱ्याच दिवसापासून प्रलंबित आहे. त्यादृष्टीने आपण पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पा. यांच्या सहकार्याने हा प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करू, असे देशमुख यांनी सांगितले. क्लस्टरबाबतची माहिती देताना क्लस्टरचे अध्यक्ष दौलत शिंदे यांनी सांगितले, या क्लस्टरमध्ये प्रशिक्षणासाठी अद्यावत यंत्रसामग्री उपलब्ध आहे. तसेच १५० पेक्षा जास्त युवकांसाठी व ८० पेक्षा जास्त महिलांसाठी निवासाची सुविधा देखील उपलब्ध आहे. शहरातील व जिल्ह्यातील युवकांनी याचा जास्तीत जास्त लाभ घेऊन रोजगारक्षम प्रशिक्षित व्हावे, अशी अपेक्षा आहे.



# मातोश्री उर्दू हायस्कूलचा दहावी निकाल ९८ टक्के

**अहमदनगर । आबीद खान**


येथील अलफलाह एज्युकेशन ॲण्ड वेलफेअर सोसायटी संचलित मातोश्री उर्दू हायस्कूल आलमगीर नागरदेवळे या विद्यालयाने यशाची परंपरा कायम राखली आहे. एसएससी परीक्षा मार्च-२०२५ च्या परीक्षेत विद्यालयाने ९८ टक्के निकाल प्राप्त केला आहे. एसएससी परीक्षेस विद्यालयातून ४३ विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते. शाळेतील विद्यार्थिनी खान बुशरा फिरोज हिने ८६.८० टक्के गुण मिळवून विद्यालयात प्रथम क्रमांक मिळविला आहे, तर दुसऱ्या क्रमांकावर शेख हुमेरा एजाज हिने ७६ टक्के, सय्यद सफिना रियाज हिने ७५.२० टक्के गुण प्राप्त करून तिसरा क्रमांक प्राप्त केला. यशस्वी विद्यार्थ्यांना संस्थेचे प्रमुख कार्यवाह प्रा.डॉ. शेख अब्दुस सलाम अब्दुल अजीज, मुख्याध्यापक शेख जमीर अहमद इस्माईल तसेच वर्गशिक्षिका खान सफिया सलीम, शेख महेनाज़ अ. सलाम, शेख एजाज अहमद अ. कुडूस, शेख अंजुम सत्तार यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल शेख अ. हसीब अ. सलाम, संस्थेचे सर्व पदाधिकारी तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी व शिक्षक-पालक संघाचे सदस्य, शिक्षक व शिक्षकेतर यांच्यासह ग्रामस्थ पालकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



**शहर मध्यवस्तीत महिला भगिनींना पिण्याच्या पाण्यात गटारीचे पाणी का येते याचा शोध लागला. माणिकचौकातील सुनिल स्टोव्ह या दुकानासमोर एक मोठ्या गटारीचे काम सुरू आहे. अगदी या गटारीमधून माळीवाडा भागाला आणि होशिंग हॉस्पिटल परिसराला पाणी पुरवठा करणाऱ्या पिण्याच्या पाण्याच्या लाईन गेल्या आहेत. या लाईनमधूनच थेट माळीवाडा आणि होशिंग हॉस्पिटल परिसरात भविष्यात गटारीचे पाणी येणार, कारण या लाईन मोठ्या सांडपाण्याच्या गटारीमधून टाकल्या आहेत.**

**(छायाचित्र - एक्स्प्रेस फोटो, अहमदनगर)**

# पी ए इनामदार इंग्लिश मिडियम स्कूल दहावीचा ९८ टक्के निकाल



**अहमदनगर । आबीद खान**

इकरा एज्युकेशन अँड वेल्फ ेअर सोसायटीच्या गोविंदपुरा येथील पी.ए. इनामदार इंग्लिश मीडियम स्कूलचा विद्यार्थ्यांनी यावर्षीही यशाची परंपरा कायम ठेवली. शाळेतील ११४ विद्यार्थ्यांनी दहावीची परीक्षा दिली. त्यापैकी ११२ विद्यार्थी परीक्षेत उत्तीर्ण झाले व दहावी बोर्डाच्या मार्च २०२५ च्या परीक्षेत शाळेचा निकाल ९८ टक्के लागला. यामध्ये शाळेचे विद्यार्थी शेख यासीन अन्सार याने ९२.६० टक्के गुण प्राप्त करून प्रथम क्रमांक मिळवला तर द्वितीय शेख मदीहा समशेर ९१.४०, तृतीय शेख मोहंमद अफ्फान अंन्सार ८८.६० टक्के गुण प्राप्त केले. या यशाबद्दल कॉलेजचे प्राचार्य फिरोसअली मराक्कटील, उपप्राचार्या फरहाना शेख तसेच संस्थेचे चेअरमन अब्दुल रहीम खोकर, व्हा. चेअरमन इंजि. इकबाल सय्यद, सचिव विकार काझी, खजिनदार डॉ. खालीद शेख, अकॅडमीक डायरेक्टर शब्बीर मोहंमद सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून कौतुक केले.

पान १ वरुन

आणि त्याच्यातूनच पुढे या बँकेची स्थापना झाली. १९३० साली या बँकेने गुळ, कापूस सरकी याच्या तारणावर कर्ज द्यायला सुरुवात केली. महाराष्ट्रामध्ये पद्मश्री विखे पाटलांनी पहिला सहकारी साखर कारखाना प्रवरानगरला काढला. त्याचे संस्थापक अध्यक्ष डॉ. धनंजयराव गाडगीळ होते. पद्मश्री होते, पण गाडगीळ यांनी या सगळ्या कामांमध्ये लक्ष घातलं. त्यामुळे प्रक्रिया करणारी कारखानदारी उभी राहायला सुरुवात झाली. हे जरी खरं असलं तरी, १९३५ साली दुसरा एक व्यवहार झाला होता. राज्य सहकारी बँकेने मदत केली, शेतकरी एकत्र आले (एका समाजाचे होते) आणि त्यांनी एक साखर कारखाना टाकला. त्याचं नाव सासवड माळी शुगर फॅक्ट्री. हा खाजगी कारखाना, पण या खाजगी कारखान्यामध्ये दोन हजारांपेक्षा जास्त शेतकरी त्याचे मालक होते. सहकारी असं रजिस्ट्रेशन नव्हतं, पण संस्था ही सहकारीच होती. ती शेतकऱ्यांनी केलेली होती व ती आजही चालू आहे. हे सहकाराचं एका दृष्टीने महत्त्वाचं पाऊल इथल्या लोकांनी टाकलं. आज आपण बघत आहोत, सहकारी संस्थेला राज्य व केंद्र सरकारची मदत व्हावी असं वाटतं. सहकारी संस्था शासनाच्या संबंधी अवलंबूनही असतात. १९५२ साली मोरारजीभाई देसाई होते. त्या काळामध्ये सहकारी चळवळीवरचं नियंत्रण सरकारी अधिकाऱ्यांमार्फत असावं, असा निर्णय मोरारजीभाईंनी घेतला. पण त्या निर्णयाला सहकारातल्या कार्यकर्त्यांनी विरोध केला. राज्य सहकारी बँकेचे जे अध्यक्ष होते श्री.आर.जी.सरैया. त्यांनी स्वच्छ सांगितलं मोरारजीभाईंना की, सहकारी चळवळीत सरकार हस्तक्षेप करत असेल तर माझा राजीनामा घ्या. त्यामुळे शेवटी मोरारजीभाईंना त्यांचा निर्णय बदलावा लागला. आज आपण सहकारामध्ये त्रिस्तरीय रचनेत काय घडलं? याची कल्पना आपल्या सगळ्यांना आहे.सहकाराच्या संबंधी मला स्वतः ला काळजी वाटते. महाराष्ट्रामध्ये किती सहकारी संस्था उभ्या राहिल्या? याची आकडेवारी आहे. पण त्याचे तीन घटक अतिशय महत्वाचे आहेत. एक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सहकारी साखर कारखानदारी आणि सहकारी सूत गिरण्या. या सगळ्यांमध्ये राज्य शासनाचं भाग भांडवल आहे. सुरुवातीच्या काळामध्ये हे साखर कारखाने निघाले, त्या काळामध्ये शेतकऱ्यांची गुंतवणूक ही अतिशय कमी म्हणजे सात ते आठ लाखांची असायची. भाग भांडवल सरकार द्यायचं. राज्य सहकारी बँक बाकीचे पैसे द्यायचे आणि त्यातून ही कारखानदारी उभी आहे. पण आपण नीट विचार जर केला, ज्याचा उल्लेख मी आता केला की या तीन संस्था. महाराष्ट्रात एकंदर जिल्हे किती? त्या जिल्ह्यातल्या सहकारी बँका किती? त्या सहकारी बँकांपैकी आजारी बँका किती? आजारी बँकांचा आकडा हा जिल्ह्यात सगळ्यात जास्त आहे. सहकारी साखर कारखानदारी! देशाची ही कारखानदारी महाराष्ट्रातून आली. यशवंतराव चव्हाण यांच्या काळामध्ये, धनंजयराव गाडगीळ यांच्या काळामध्ये, भाऊसाहेब हिरे यांच्या काळामध्ये, वसंत दादा पर्यंतच्या काळामध्ये या कारखानदारीमध्ये एक प्रकारची शक्ती होती, आर्थिक स्थैर्य होतं. आज महाराष्ट्रातले सगळे साखर कारखाने हे जर बघितले तर काय परिस्थिती आहे? एक काळ असा होता की सहकारी संस्था, सहकारी कारखाने यांची संख्या ही एकंदर राज्यात असलेल्या कारखान्याच्या ८० टक्के होती आणि २० टक्क्यांच्या आसपास खाजगी होते. आज खाजगी कारखान्यांची संख्या ५० टक्क्यांपेक्षा जास्त आहे. अनेक सहकारी कारखाने हे सहकारी राहिलेले नाहीत, त्याचं खाजगीकरण झालं आहे. गंमतीची गोष्ट अशी आहे की, काही ठिकाणी जे सहकारी कारखान्याचे प्रमुख होते. तो कारखाना बंद पडतो, त्याचं खाजगीकरण होतं. मग त्या कारखान्याची विक्रीही होते आणि तो खासगीकरण झालेला कारखाना हा तोच प्रमुख विकत घेतो. असे लोक या कारखानदारीमध्ये ठिकठिकाणी बघायला मिळतात. म्हणून ज्यावेळेला सहकाराचं सक्षमीकरण म्हणून आपण विचार करायचा म्हणतो. त्यावेळी या सगळ्या गोष्टींचा विचार करायचा की नाही? आज महाराष्ट्रामध्ये दोन किंवा तीन सूत गिरण्या कशाबशा चालू आहेत, बाकीचे सगळ्या बंद आहेत. ही सूत गिरण्यांची अवस्था आहे. मला असं वाटतं राज्याचे मुख्यमंत्री या ठिकाणी आहेत. फडणवीसजी, एक तुम्ही कमिशन अपॉइंट करा. या सगळ्या संस्था, सगळ्या घेऊ नका. साखर कारखाने घ्या, बँका घ्या, सूत गिरण्या घ्या आणि प्रत्येकाचा सखोल अभ्यास करा. का असं घडतंय? ते घडलं असेल तर दुरुस्त कसं करायचं? आणि इथून पुढच्या काळामध्ये या सगळ्या संस्था सक्षम आणि शक्तिशाली कशा होतील? त्यासाठी धोरणांमध्ये काही बदल करायचा का? त्यासाठी कायद्यात काही बदल करायचा का? या सगळ्या गोष्टींचा विचार करण्याची आज वेळ आलेली आहे. हे जर आपण केलं नाही तर हे फक्त इतिहासात लिहिलं जाईल की, एकेकाळी महाराष्ट्रात अशा अशा प्रकारच्या संस्था होत्या. खरं म्हटलं तर या क्षेत्रामध्ये महाराष्ट्रामधील अनेकांनी प्रचंड योगदान दिलं. वैकुंठभाई मेहता. मोरारजी भाईंच्या कालखंडामध्ये ते सहकार मंत्री होते. मला वाटतं ह्या बँकेतहि ते होते. महाराष्ट्र आणि गुजरात इथल्या सगळ्या संस्थांची उभारणी याच्यामध्ये वैकुंठभाई यांचं योगदान प्रचंड होतं. नंतरच्या काळामध्ये धनंजयराव गाडगीळ यांचं योगदान होतं. राज्य सहकारी बँकेचे अध्यक्ष भाऊसाहेब हिरे होते त्या कालखंडामध्ये. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे अध्यक्ष वसंतदादा होते. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे अध्यक्ष अजित पवार होते. त्या सगळ्या कालखंडामध्ये ती बँक एक शक्तीशाली बँक म्हणून देशामध्ये ओळखली जायची. मध्यंतरी तिची अवस्था इतकी वाईट झाली की, माझ्यासारख्याला आणि अनेकांना अतिशय अस्वस्थता वाटायची. अनास्कर यांच्याकडे हे काम सोपवावं, असं अनेकांनी सांगितलं. राज्य सरकारने हा निर्णय घेतला. मी अनास्कर यांचं अभिनंदन करतो. त्यांनी अतिशय कष्ट केले आणि ही सबंध सहकारी बँका उर्जित अवस्थेला आणण्याचं चित्र उभं केलं. आता जी आकडेवारी अजित पवारांनी सांगितली, ती बोलकी आकडेवारी आहे. ती आकडेवारी स्वच्छ सांगते की, ही बँक आता सावरली व ती स्वतःच्या पायावर उभी राहिली. हे जे काम केलं अनास्कर यांनी ते राज्य सहकारी बँकेपुरतं आणि विद्या सहकारी बँकेपुरतं सिमीत ठेवू नका. या दोन्ही ठिकाणी तुम्ही काम केलं, आपण आणखी बाकीचे लोक घेऊ आणि मुख्यमंत्र्यांची मदत घेऊ. जे जे काही करणं शक्य असेल ते या सगळ्या सहकारी संस्थांना उर्जित अवस्थेत आणण्यासाठी ठोसपणाचे निकाल घेऊन आज त्याची अत्यंत गरज आहे. मला असं वाटतं याचा विचार आपण सगळ्यांनी केला पाहिजे. एकेकाळी महाराष्ट्रामधलं सहकार हे अभिमानाने आपण सांगत होतो. ते दिवस आणण्याची जबाबदारी ही आपल्या सगळ्यांना घ्यावी लागेल. राज्य सरकारची मदत घ्यावी लागेल आणि पुन्हा एकदा हे सबंध डोलारा सावरला जाईल आणि सामान्य माणसाला त्याच्या व्यक्तिगत अडचणीच्या काळामध्ये या सहकारी संस्था त्याच्या पाठीशी राहतात, या प्रकारचे चित्र या राज्यात आपण निर्माण करण्याचा निर्धार करूया.

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com** , **उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी – गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफिसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com **(वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)**

## कोटा एक्सलंन्स सेंटर शेवगावचा १०० टक्के निकाल

### उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळ पुणे यांच्यावतीने आज इयत्ता दहावी बोर्ड परीक्षा फेब्रुवारी / मार्च २०२५ चा निकाल ऑनलाइन जाहीर करण्यात आला. या परीक्षेत कोटा एक्सलंन्स सेंटर , शेवगावच्या इ.१० वीच्या विद्यार्थ्यांचे उज्वल यश प्राप्त करत उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळ पुणे यांच्यावतीने आज इयत्ता दहावी बोर्ड परीक्षा फेब्रुवारी/मार्च २०२५ चा निकाल जाहीर करण्यात आला. या परीक्षेत कोटा एक्सलन्स सेंटरचे सर्व विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. प्रथम तीन विद्यार्थी मुरदारे चेतन सोमनाथ ९५.४०% , कंठाळी गौरी सुधीर ९५.००%, झिरपे ज्ञानेश्वरी महारुद्र ९४.००%गुण मिळवून यश संपादित केले आहे. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक प्राध्यापकांचे अभिनंदन आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे अध्यक्ष ॲड.डॉ. विद्याधर काकडे, मा.जिल्हा परिषद सदस्या हर्षदा काकडे ,संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. डॉ.लक्ष्मण बिटाळ,संस्थेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी पृथ्वीसिंह काकडे ,शिक्षण विभाग प्रमुख वंदना पुजारी, सहप्रमुख प्रा. अशोक आहेर ,प्राचार्य संपतराव दसपुते,उपप्राचार्या रूपा खेडकर, उपमुख्याध्यापिका पुष्पलता गरुड,विभाग प्रमुख हरीश खरड , डायरेक्टर राजेश दारकुंडे, शिव अग्रवाल ,समता नेव्हल ,देवेंद्र लांडे यांनी केले.तसेच सर्व विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## दहावी, बारावी निकालात महादजी शिंदे विद्यालयाची गगनभरारी

**श्रीगोंदा । सचिन झगडे**



रयत शिक्षण संस्थेच्या श्रीगोंदा येथील महादजी शिंदे विद्यालयाने दहावी व बारावीच्या परीक्षेत यंदा घवघवीत यश संपादन करत एक उत्तुंग गगनभरारी घेतली आहे. पुणे मंडळाने नुकताच जाहीर केलेल्या निकालात शाळेचा दहावीचा निकाल ९७.६०% तर बारावीचा निकाल ९८.३३% इतका आहे.

महादजी शिंदे विद्यालयाच्या दहावीच्या विद्यार्थ्यांनी उज्ज्वल यश मिळवले असून शिंदे धैर्यशील बाळू याने ९६.८०% गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला. त्याच्या पाठोपाठ भूतारे वेदांत प्रवीण ९६% व वाळके संस्कार नितीन ९५.८० यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवले. ज्युनिअर कॉलेजचा निकालही लक्षणीय असून ९८.३३% इतकी यशस्वी टक्केवारी नोंदवण्यात आली आहे. सुद्रिक यश मच्छिंद्र ७३.१७ टक्के प्रथम , कु. पठाण सुफिया अख्तर ७१.८३ टक्के द्वितीय,बोरुडे जाई शिवाजी ७०.८३ तृतीय या अपूर्व यशाबद्दल शाळेचे प्राचार्य दिलीप भुजबळ, उपप्राचार्य शहाजी एकाड, पर्यवेक्षिका सुनिता काकडे, स्थानिक स्कूल कमिटीचे अध्यक्ष बाबासाहेब भोस, रवि दंडनाईक, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष आयएएस अधिकारी भाऊसाहेब दांगडे, माजी मंत्री बबनराव पाचपुते, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य राहुल जगताप आदींनी यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षक-प्राध्यापकांचे मनः पूर्वक अभिनंदन केले.

## सायन्स फोरम ॲकॅडमीचे दहावी बोर्ड परीक्षेत घवघवीत यश


**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

तालुक्यातील पारे यांच्या सायन्स फोरम अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी इयत्ता १२ वी प्रमाणे इयत्ता १० वी बोर्ड परीक्षेतदेखील दैदिप्यमान यश संपादन केले आहे. सायन्स फोरम अकॅडमीचीविद्यार्थिनी श्रावणी मनोहर लकडे ९८.४०टक्के मिळवून इयत्ता १०वी बोर्ड परीक्षेत श्रीगोंदा तालुक्यातून प्रथम तर सानवी झरकर या विद्यार्थीनीस गणित विषयात १०० पैकी १०० गुण मिळवून राज्यात प्रथम क्रमांक पटकाविला आहे. त्याचप्रमाणे धैर्यशील शिंदे ९६.८० टक्के, सानिका झरकर ९६.६० टक्के, वेदांत भुतारे ९६ टक्के,प्रणिता नन्नवरे ९५.६० टक्के, शिवानी दरेकर ९५.४० टक्के, कादंबरी गायकवाड ९४.४० टक्के, समर्थ दिवटे ९४.०० टक्के विद्यार्थ्यांनी गुण मिळवलेले असून इयत्ता



१० वी वर्गातील एकूण ६ विद्यार्थांना ९५ टक्केपेक्षा जास्त गुण मिळाले आहेत आणि बऱ्याच विद्यार्थ्यांनी ९० टक्के पेक्षा अधिक गुण संपादन केले आहेत. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व पालकांचे प्रोफेसर पारे यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## समताच्या विद्यार्थ्यांचा घवघवीत निकाल आणि गुणवत्तेत नवा विक्रम



**होय! हाच आहे समता पॅटर्न या घोषवाक्याला यंदाच्या निकालाने पुन्हा एकदा अर्थ प्राप्त करून दिला आहे. ९० टक्के विद्यार्थ्यांनी या परीक्षेत ७० पेक्षा जास्त गुण प्राप्त केले आहेत. विशेष म्हणजे समता इंटरनॅशनल स्कूलच्या वसतिगृहातील ६ विद्यार्थ्यांनी ९० पेक्षा अधिक गुण मिळविले. तसेच सर्वच विद्यार्थी प्रथम श्रेणी मध्ये उत्तीर्ण झाले आहेत.**

**कोपरगाव । किसन पवार**

येथील समता इंटरनॅशनल स्कूल या उपक्रमशील व गुणवत्तापूर्ण शिक्षण देणाऱ्या आणि विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानलेल्या शाळेने यंदाच्या दहावीच्या सीबीएसई परीक्षेच्या निकालात आपली उज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे. सलग ९ वर्षे शंभर टक्के निकालाची परंपरा राखणाऱ्या समताने यंदाही एक उत्कृष्ट कामगिरी साकारली आहे. शाळेचे विद्यार्थी दर्शील भरत अजमेरा (९९ ), हर्षद नवनाथ जाधव ( ९८.६०), अन्वी संजय उंबरकर ( ९८ ), दीक्षा प्रवीणकुमार दोषी (९६.८०), प्रथमेश सुमित भट्टड (९६.६०), सोहम बाबासाहेब साताळकर (९६ ), आर्यन भरत कुमार (९५.६०), मानसी कैलास भुसारे (९५ ), नक्षत्रा जयसिंग मर्मट (९५) यांनी अव्वल यश संपादन करत शाळेच्या यशात भर घातली आहे. विशेष म्हणजे दर्शील याला विज्ञान विषयात तर हर्षद याला इंग्रजी आणि आयटी या दोन्ही विषयात १०० पैकी १०० गुण प्राप्त झाले आहेत. अजिंक्य दिलीप मुठे याने देखील इंग्रजी व आयटी या विषयात १०० पैकी १०० गुण मिळवले आहे. तसेच अन्वी संजय उंबरकर, दीक्षा प्रवीणकुमार दोषी, सोहम बाबासाहेब साताळकर, आर्यन भरत कुमा यांनीही आयटी विषयात १०० पैकी १०० गुण मिळवत उज्वल यश मिळविले आहे. समता इंटरनॅशनल स्कूलचे संस्थापक काका कोयटे, कार्यकारी विश्वस्त स्वाती कोयटे, व्यवस्थापन समिती सदस्य, प्राचार्य समीर अत्तार यांनी समता पॅटर्नच्या यशस्वी अंमलबजावणीचे श्रेय शिक्षकवृंद, पालक व विद्यार्थ्यांना देत सर्वांचे विशेष अभिनंदन केले. यशस्वी निकालामुळे कोपरगाव व परिसरात शाळेच्या शैक्षणिक कार्याची पुन्हा एकदा दखल घेतली जात आहे.



## यशवंत विद्यालय २२ वर्षांची १०० टक्के निकालाची परंपरा कायम

**नगर तालुका । प्रतिनिधी**

तालुक्यातील हिवरे बाजार येथील यशवंत माध्यमिक विद्यालयाच्या इयत्ता दहावीच्या मार्च २०२५ च्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून याहीवर्षी विद्यालयाने १०० टक्के निकालाची परंपरा कायम ठेवली आहे.

श्रुती संभाजी ठाणगे ९५.०० टक्के गुण मिळवून टाकळी खातगाव केंद्रात तसेच विद्यालयात प्रथम आली, ढगे अनोश कांचन ९३.२० टक्के गुण मिळवून टाकळी खातगाव केंद्रात तसेच विद्यालयात द्वितीय तर श्रुतिका कुशाबा ठाणगे ही ९०.२० टक्के गुण मिळवून विद्यालयात तृतीय क्रमांक मिळवला आहे. एकूण ३० विद्यार्थी परीक्षेस बसले होते. त्यापैकी १९ विद्यार्थी विशेष गुणवत्ता प्राप्त आहेत.

०८ विद्यार्थी प्रथम श्रेणी व ०३ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले. त्यांना मुख्याध्यापक मुरलीधर अमृते, उपाध्यापक दिपक ठाणगे, कैलास खैरे, नंदकुमार झावरे, नीता सोनवणे, दिपक पवार व रावसाहेब चत्तर यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आदर्श गाव संकल्प व प्रकल्प समिती पदमश्री डॉ. पोपट पवार, सरपंच विमलताई ठाणगे, चेअरमन छबुराव ठाणगे, व्हा. चेअरमन रामभाऊ चत्तर, ज्येष्ठ शिक्षक हरिभाऊ ठाणगे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष एस.टी.पादीर, मंगेश ठाणगे, राजू सहादू ठाणगे, चेअरमन दूध डेअरी बाबासाहेब गुंजाळ, रोहिदास पादीर, सहदेव पवार गुरुजी, दत्तात्रय ठाणगे, सर्व पालक व ग्रामस्थांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे फेटा बांधून, श्रीफळ, गुलाबपुष्प देऊन व पेढे भरवून अभिनंदन केले.

## पाणीटंचाई, खरीपपूर्व कृषी आढावा बैठकीचे आयोजन

**अहमदनगर । प्रतिनिधी**

नगर तालुक्यात खरीप हंगामपूर्व आढावा घेण्यासाठी व आगामी पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर उपाययोजना ठरवण्यासाठी एक विशेष बैठक गुरुवार ता. १५ मे २०२५ रोजी सकाळी ११ वाजता जुने कलेक्टर ऑफिस, अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीस आमदार शिवाजीराव कर्डिले, आमदार काशिनाथ दाते आणि आमदार विक्रम पाचपुते उपस्थित लाभणार आहेत. तसेच तहसीलदार, गटविकास अधिकारी, कृषी अधिकारी, सर्व ग्रामसेवक आणि विविध शासकीय विभागांचे अधिकारी व कर्मचारीही या बैठकीला उपस्थित राहणार असल्याची माहिती कृषी कार्यालयाकडून देण्यात आली आहे. खरीप हंगामातील तयारी, पेरणीपूर्व नियोजन, बियाणे व खते उपलब्धता, तसेच पाणीटंचाईच्या उपाययोजनांसंदर्भात या बैठकीत सविस्तर चर्चा होणार आहे. सर्व शेतकरी बांधव, ग्रामस्थ आणि नागरिकांनी बैठकीस उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले.

## मोहित बारगळ याची एमपीएससीतून क्लास वन अधिकारीपदी निवड; अभियांत्रिकी विभागात १११ वा क्रमांक

**नगर तालुका । प्रतिनिधी**

येथील मोहित अजयकुमार बारगळ याची एमपीएससी परीक्षेतून क्लास वन अधिकारी पदी निवड झाली.

नुकत्याच झालेल्या एमपीएससी परीक्षेत अभियांत्रिकी विभागात त्याने १११ वा क्रमांक मिळवला आहे. मोहित बारगळ पिंपळगाव माळवी (ता. नगर) येथील असून, त्याने स्ट्रक्चर मधून पोस्ट ग्रॅज्युएट केले आहे. त्याचे इंजिनिअरिंगचे शिक्षण विखे पाटील इंजिनिअरिंग कॉलेज विळद घाट येथून पूर्ण झाले आहे. लहानपणापासून अभ्यासात हुशार असलेला मोहित याने उच्च स्वप्न ठेवून छोटे-छोटे उद्दिष्ट पार करत क्लास वन अधिकारी होण्याचे यश मिळवले आहे. सध्या तो जलसंपदा उपविभाग उरळीकांचन या ठिकाणी स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदावर कार्यरत आहे. मोहित हा रुपीबाई मोतीलालजी बोरा न्यू इंग्लिश हायस्कूलचे प्राचार्य अजयकुमार बारगळ यांचा मुलगा आहे. त्याने मिळवलेल्या यशाबद्दल त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## महाराष्ट्र लोकसेवा हक्क कायद्याची जनमानसात व्यापक स्वरूपात जागृती करा- आयुक्त चित्रा कुलकर्णी

**राहुरी । प्रतिनिधी**

जनतेला पारदर्शकपणे व विहित कालावधीमध्ये सेवा मिळावी यासाठी अधिकाऱ्यांनी सकारात्मक दृष्टीकोन ठेवत लोकसेवा हक्क कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी. नावीन्यपूर्ण उपक्रम राबवत जनमानसात कायद्याची अधिक व्यापक स्वरूपात जागृती करण्याचे निर्देश राज्य सेवा हक्क आयोगाच्या आयुक्त चित्रा कुलकर्णी यांनी दिले. पंचायत समिती सभागृह, राहुरी येथे श्रीरामपूर व राहुरी तालुकास्तरीय प्रमुख अधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीत कुलकर्णी बोलत होत्या. यावेळी आयोगाचे उपसचिव सुनिल जोशी, सहायक कक्ष अधिकारी प्रशांत घोडके, महाआयटीचे महाव्यवस्थापक संतोष खैरनार, श्रीरामपूरचे तहसीलदार मिलिंदकुमार वाघ, राहुरीचे तहसीलदार नामदेव पाटील, गटविकास अधिकारी सुधाकर मुंढे, प्रशांत सिनारे, नायब तहसीलदार संध्या दळवी आदी उपस्थित होते.



यावेळी कुलकर्णी म्हणाल्या, जनतेला पारदर्शक, गतीमान आणि दिलेल्या कालमर्यादेत माहिती तंत्रज्ञानाचा वापर करुन अधिक प्रभावीपणे ऑनलाईन सेवा देण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क कायदा करण्यात आला आहे. शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांनी कायद्याचा सखोल अभ्यास करत जनतेला विहित वेळेत सेवा देण्यासाठी संवेदनशीलतेने काम करावे. या कायद्याच्या अंमलबजावणीने प्रशासन अधिक गतीमान आणि पारदर्शक होण्यास मदत होणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. शासकीय नोकरी म्हणजे जनसेवेचे एक माध्यम आहे. लोकसेवक म्हणून काम करत असताना प्रत्येक अधिकारी, कर्मचाऱ्यांनी जनहिताच्या भावनेने सर्वसामान्यांना सेवा द्यावी. सेवा देताना नागरिकांची कुठल्याही प्रकारची अडवणूक होणार नाही याची खबरदारी घेण्याच्या सूचनाही आयुक्त कुलकर्णी यांनी दिल्या. शासनाच्या विविध विभागांच्या सेवा वेगवेगळ्या पोर्टलवरून देण्यात येतात. या सर्व पोर्टलचे एकत्रीकरण करून आपले सरकार केंद्रावरून सेवा देण्यासाठी शासन आग्रही आहे. गुड गव्हर्नन्समध्ये आपले राज्य देशात अग्रेसर राहावे यासाठी राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी आग्रही भूमिका घेतली असून ऑनलाईन सेवा न देणाऱ्या विभागाच्या प्रमुखांना दरदिवशी दंड करण्याचा निर्णयही करण्यात आला आहे. त्यामुळे प्रत्येकाने गांभीर्यपूर्वक कायद्याची अंमलबजावणी करावी. कायद्याचं महत्त्व, अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या जबाबदाऱ्या आदी बाबी लक्षात घेऊन काम करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी घेताना सात दिवसांचा वेळ देऊन नोटीस बजवावी. सुनावणीसाठी अपिलकर्त्यासोबतच पदनिर्देशित अधिकाऱ्यांनी बोलावण्यात यावे. संपूर्ण अभिलेख्याची तपासणी करून निष्पक्ष व पारदर्शीपणे निकाल द्यावा. अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे सामान्यांचे नुकसान होणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. बैठकीस राहुरी व श्रीरामपूर तालुक्यातील सर्व विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

## आबासाहेब काकडे विद्यालयाची उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम

**शेवगाव । नरहरी शहाणे**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या फेब्रुवारी-मार्च २०२५ दहावी बोर्ड परीक्षेत आबासाहेब काकडे माध्यमिक विद्यालयाने उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखत सेमी माध्यमाचा निकाल ९६.४८ तर मराठी माध्यमाचा निकाल ७०५१ इतका लागला असून सेमी माध्यमामध्ये कु. शुभांगी संजय विखे हिने ९५.६० गुण मिळवून प्रथम येण्याचा मान मिळवला असून चि. चेतन सोमनाथ मुरदारे याने ९५.४० गुण मिळवून द्वितीय क्रमांक पटकावला, तर कु. गौरी सुधीर कंठाळी हिने ९५.०० गुण मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त केला. मराठी माध्यमाचा निकाल ७०५१ लागला असून कु. शुभांगी भगवान भवर हिने ८०.८० गुण मिळून प्रथम क्रमांक पटकावला. कु. कावेरी अशोक काळे ७९.२० गुण मिळवून द्वितीय क्रमांक मिळवला तर कु.वर्षा दगडू नजन हिने ७८.४० गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळवला असून विद्यालयाचा सरासरी शेकडा निकाल ८५.९० इतका लागला असून ९८ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. ६८ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले आहेत ,पैकी १२ विद्यार्थ्यांनी ८५ ते ९० च्या दरम्यान गुण मिळवले आहेत तर ७ विद्यार्थ्यांनी ९० पेक्षा जास्त गुण मिळवून आपली गुणवत्ता सिद्ध केली. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष ॲड.डॉ.विद्याधर काकडे,जि.प.सदस्या हर्षदा काकडे,संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा.डॉ. लक्ष्मण बिटाळ, विश्वस्त पृथ्वीसिंह काकडे,शिक्षण विभाग प्रमुख वंदना पुजारी, सहप्रमुख अशोक आहेर,प्राचार्य संपतराव दसपुते,उपमुख्याध्यापिका पुष्पलता गरुड, उपप्राचार्या रुपा खेडकर,पर्यवेक्षक सुनील आव्हाड,हरिश्चंद्र मडके,शिवाजी पोटभरे यांच्यासह पालक वर्गाने अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# धक धक गर्ल माधुरीचा वाढदिवस

हिंदी चित्रपट सृष्टीतील सदाबहार अभिनेत्री, लाखो दिलांची धडकन, धक धक गर्ल माधुरी दिक्षितचा आज ५८ वा वाढदिवस. माधुरी दीक्षित म्हणजे हिंदी चित्रपट सृष्टीला पडलेले एक मधुर स्वप्न. आज जे ४० ते ६० या वयोगटात आहे त्यांच्यासाठी माधुरी म्हणजे सर्वस्व होते. माधुरीला पाहतच हे लोक लहानाचे मोठे झाले. माधुरीचा चित्रपट फर्स्ट डे फर्स्ट शो पाहणाऱ्यांची संख्या त्या काळात लाखोंच्या घरात होती. १५ मे १९६७ रोजी जन्मलेली माधुरी म्हणजे सुंदरता, नृत्य आणि अभिनय यांचा त्रिवेणी संगम. वयाच्या १७ व्या वर्षी हिंदी चित्रपट सृष्टीत प्रवेश करणाऱ्या माधुरीचा पहिलाच चित्रपट अबोध आपटला त्यामुळे तिच्या पदार्पणाची दखल कोणी घेतली नाही. त्यानंतर तिने काही बी ग्रेड चित्रपटातही भूमिका केल्या. उत्तर दक्षिण हा तिचा तसा पहिला व्यावसायिक चित्रपट मात्र यातीलही तिच्या भूमिकेची कोणी दखल घेतली नाही मात्र तेजाब चित्रपट आला आणि तिचे नशीबच बदलले. तेजाब चित्रपटातील एक दो तीन... हे गाणे जबरदस्त हिट झाले. या गाण्यातील तिच्या नृत्याने तरुणांना वेड लावले. या चित्रपटातील तिने साकारलेली मोहिनी नावाची भूमिका प्रेक्षक आजही विसरू शकले नाहीत. माधुरीने हा चित्रपट आपल्या अभिनय आणि नृत्याने यशस्वी करून दाखवला. या चित्रपटानंतर निर्माते दिग्दर्शक तिच्या घरी रांगा लावू लागले. सलग आठ चित्रपट फ्लॉप झालेल्या माधुरीची तेजाबच्या यशानंतर यशस्वी अभिनेत्रींमध्ये गणना होऊ लागली. या चित्रपटात तिचा नायक अनिल कपूर हा होता. ही जोडी प्रेक्षकांना खूप आवडली. पुढे या जोडीने परींदा, रामलखन, किशन कन्हैया, जीवन एक संघर्ष, जमाई राजा, खेल, बेटा, जिंदगी एक जुआ, राजकुमार, पुकार असे अनेक हिट चित्रपट दिले. माधुरीची जोडी केवळ अनिल कपूरशीच जमली असे नाही तर जॅकी श्रॉफ, मिथुन चक्रवर्ती, ऋषी कपूर, संजय दत्त, शाहरुख खान, अमीर खान, सलमान खान अशा सर्वच अभिनेत्यांशी जमली. तिने अभिनय केलेले जवळपास सर्वच चित्रपट यशस्वी झाले. तेजाब, दिल, साजन, परींदा, राम लखन, खलनायक, हम आप के है कौन, प्रेमग्रंथ, मृत्युदंड, बडे मिया छोटे मिया, बेटा, कोयला, दिल तो पागल है, देवदास हे चित्रपट तिकीट बारीवर तुफान यशस्वी ठरले. तिचे अनेक चित्रपट हिट तर काही सुपरहिट झाले. तिच्या हम आपके है कौन या चित्रपटाने तर इतिहास घडवला. या चित्रपटातील तिच्या अभिनयाने आणि सौंदर्याने अनेकांना घायाळ केले. या चित्रपटातील तिची भूमिका पाहून प्रसिद्ध चित्रकार एम एफ हुसेन हे तिच्यावर इतके फिदा झाले की त्यांनी तिचे शेकडो पोट्रेट बनवले यावरून लोक त्यांना माधुरी फिदा हुसेन असे म्हणू लागले. त्यांनी तिच्यावर गजगामीनी नावाचा चित्रपटही बनवला. माधुरीच्या नावाचे गाणेही आले ( माधुरी मिली मुझे रस्ते मे...) इतकेच काय तर तिच्या नावाने चित्रपट देखील आला ( मै माधुरी दीक्षित बनना चाहती हु) तिला अनेक पुरस्कार मिळाले. प्रतिष्ठेचा फिल्मफेअर पुरस्कार तिने तब्बल पाच वेळा मिळवला. दिल, बेटा, हम आप के है कौन, दिल तो पागल है, देवदास या चित्रपटातील तीच्या भूमिकेसाठी तिला फिल्मफेअरने सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार दिला. तिने राष्ट्रीय पुरस्कारही मिळवला. भारत सरकारने तिला पद्मश्री हा मानाचा पुरस्कार देऊन गौरविले आहे. माधुरीने जवळपास ७० हुन अधिक चित्रपटात भुमीका केल्या. यातील तिच्या भूमिका आजही लोकप्रिय आहेत. लोकप्रेयतेच्या शिखरावर असतानाच तिने श्रीराम नेणे या अमेरिकास्थित उद्योगपतीशी लग्न केले. लग्नाआधी तिचे संजय दत्तशी अफेअर आहे ते दोघे लग्न करणार असे फिल्मी मासिकात छापून येत होते तिने मात्र या सर्व अफवा असल्याचे सिद्ध केले आणि लग्नानंतर थेट अमेरिका गाठली. अमेरिकेत काही वर्षे राहिल्यावर ती पुन्हा मुंबईत परतली. मुंबईत परतल्यावर तिने गुलाब गँग आणि देढ इष्कीया या चित्रपटाद्वारे पुनरागमन केले. त्यानंतर तिने टेलिव्हिजनवर झलक दीखला जा, डान्स इंडिया डान्स यासारख्या नृत्यावर आधारित रिऍलिटी शो चे जज म्हणूनही काम केले. आज इतक्या वर्षानंतरही माधुरीची जादू कायम आहे. गेल्या दोन दशकात शेकडो अभिनेत्री हिंदी चित्रपट सृष्टीत आल्या आणि गेल्या पण तिची बरोबरी करणारे तर सोडाच पण तिच्या जवळपास पोहचेल अशी एकही अभिनेत्री हिंदी चित्रपट सृष्टीला मिळाली नाही यातूनच माधुरीचे श्रेष्ठत्व सिद्ध होते. सौंदर्य, नृत्य आणि अभिनय यांचा त्रिवेणी संगम असलेल्या सदाबहार अभिनेत्री माधुरी दिक्षितला वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा......!





श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

समाजसंवाद

# दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे दै. रयत समाचारकडून

हार्दिक अभिनंदन



आनंद राणी नवनाथ उगले
रेसिडेन्सीअल हायस्कूल, अहिल्यानगर



श्रावणी कल्पना आनंद भवार
आदर्श कॉन्व्हेंट , बुलढाणा , अमरावती



प्रेम वैशाली योगेश उकिर्डे
एस एस मोहिते विद्यालय केडगाव



सुमन रेखा दिलीप घोडकिया
एस एस मोहिते विद्यालय केडगाव



हर्षाली वैशाली आवेश चव्हाण
एसएस मोहिते विद्यालय केडगाव

# मराठी माणसाने व्यावसायिक कौशल्ये आत्मसात करावीत- गोरखे



## कमोडिटी मार्केटिंग कार्यशाळा संपन्न

पिंपरी । प्रदीप गांधलीकर

मराठी माणसाने व्यावसायिक कौशल्ये आत्मसात करावीत असे विचार आमदार अमित गोरखे यांनी सिझन्स बँक्वेट हॉल, यमुनानगर, निगडी प्राधिकरण येथे सोमवार, ता. १२ मे २०२५ रोजी व्यक्त केले. विराज एक्सलन्स कमोडिटी सेंटर आयोजित दोन दिवसीय राज्यस्तरीय कमोडिटी मार्केटिंग कार्यशाळेत प्रमुख पाहुणे म्हणून आमदार अमित गोरखे बोलत होते. विराज एक्सलन्स कमोडिटी सेंटरचे संचालक विराज जमदाडे यांची याप्रसंगी प्रमुख उपस्थिती होती. कमोडिटी एक्सलन्स कार्यशाळेत महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेरील विविध भागांतून वेगवेगळ्या वयोगटातील सुमारे १५० प्रशिक्षणार्थी सहभागी झाले होते. त्यामध्ये शालेय विद्यार्थ्यांपासून विविध क्षेत्रांतील व्यावसायिकांचा आणि महिलांचाही लक्षणीय सहभाग होता.

अमित गोरखे म्हणाले की, मराठी माणूस फारसा व्यवसायाकडे वळत नाही; परंतु विराज जमदाडे यांच्यासारखा उच्चशिक्षित मराठी तरुण विराज एक्सलन्स कमोडिटी सेंटरच्या माध्यमातून कमोडिटी मार्केटिंगबाबत शास्त्रशुद्ध प्रशिक्षण देत आहे, ही अतिशय आनंदाची बाब आहे असे गौरवोद्गार काढून अमित गोरखे पुढे म्हणाले की, या क्षेत्रात अभ्यास, सातत्य आणि एखाद्या अपयशाने घाबरून न जाण्याची गरज असते. प्रशिक्षणातून या गोष्टी साध्य होतात विराज जमदाडे यांनी, कमोडिटी मार्केटिंग हा आधुनिक काळात महत्त्वाचा व्यवसाय असून संगणकाच्या साहाय्याने घरात बसून आपण तो करू शकतो. सोने, चांदी यासारखे मौल्यवान धातू, खनिज तेल आणि अनेक वस्तूंची खरेदी – विक्री करून त्यातून नियमितपणे आर्थिक लाभ मिळवता येतो. अर्थातच त्यासाठी शास्त्रशुद्ध प्रशिक्षणाची गरज असते. कार्यशाळेत मोठ्या पडद्यावर खरेदी – विक्री आणि तांत्रिक बाबींचे प्रात्यक्षिक दाखवून मार्गदर्शन करण्यात येते. आतापर्यंत वेगवेगळ्या ठिकाणी प्रशिक्षण कार्यशाळांचे विराज एक्सलन्स कमोडिटी सेंटरच्या वतीने यशस्वी आयोजन करण्यात आलेले आहे. ही अठरावी कार्यशाळा असून त्यालादेखील उत्तम प्रतिसाद लाभला आहे अशी माहिती दिली.

# बालचित्रकार अब्दुल्ला

श्रीरामपूरचा माझा लाडका विद्यार्थी अब्दुल्ला शेख याने शाळा सोडली होती. त्याची हजेरी कमी भरल्याने त्याचे नाव पटावरून कमी करण्यात आले होते. मला ही बातमी समजताच मी तत्काळ रजा टाकली आणि श्रीरामपूर गाठलं. अब्दुल्लाच्या घरी गेलो. त्याला व त्याच्या घरच्यांना समजून सांगितले. त्याच्या शाळेतील मुख्याध्यापक यांना भेट दिली. तो मुकबधीर मुलगा आहे. त्याला सांभाळून घ्या. असे सांगितले. त्याने माझं ऐकलं. पुन्हा शाळेत दहावीला प्रवेश घेतला. आज अचानक बालचित्रकार अब्दुल्ला याच्या वडिलांचा फोन आला. म्हणाले, सर, तुमचा अब्दुल्ला ७१ टक्के मिळवून पास झाला. ऐकताच मनाला खूप खूप समाधान वाटले. ज्या मुलाला बोलता येत नाही. ऐकू येत नाही, असा मुलगा पाचवीला असताना वाटेत भेटला त्याला हात दिला. आज तो योग्य दिशेला निघाला. यापेक्षा मोठा पुरस्कार काय असू शकतो. सहवासात असताना रोज संध्याकाळी त्याला घरी चित्रकला शिकवायचो. तो डॉक्टर, इंजिनिअर होऊ शकत नाही. समाजही अशा मुलांना दुर्लक्षित करतो. पण माझं स्वप्न आहे त्याला जगातला सर्वात महान चित्रकार झालेलं मला पाहायचं आहे. त्याला कलेच्या शिक्षणाची गरज आहे. आज दहावी पास झाल्यामुळे त्याचा मार्ग मोकळा झाला. प्रिय अब्दुल्ला, तुझे खूप खूप अभिनंदन !

राहुल पगारे
दापूर, सिन्नर, नाशिक
८६०५३०४०१६



# अब्दुल सत्तार बाबामियां यांचे निधन



अहमदनगर । प्रतिनिधी

येथील सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार शाकीर शेख यांचे वडील शेख अब्दुल सत्तार बाबामियां यांचे निधन झाले. अंत्ययात्रा बुधवारी ता.१४ मे रोजी मगरीबच्या नमाजनंतर तवक्कल वस्ताद मळा, गाजीनगर येथून निघून गंजे शहीदा कब्रस्तान येथे दफनविधी झाला. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.







कै. अरुणकाका बलभीम जगताप यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ श्रद्धांजली शोकसभा यशवंतराव चव्हाण सहकार सभागृह येथे झाली. यावेळी महाराष्ट्र, अहमदनगर जिल्हा तसेच शहरा–तून व्यावसायिक, राजकीय, सामाजिक, औद्योगिक, अध्यात्मिक, आरोग्य, कला, साहित्य आदी क्षेत्रातील मान्यवरांनी आदरांजली वाहिली.

# आनंद विद्यालयाची १०० टक्के निकालाची परंपरा कायम





अहमदनगर । प्रतिनिधी

शहरातील आनंद विद्यालयाने यंदाही दहावीच्या निकालात आपली उत्कृष्ट निकालाची परंपरा अबाधित ठेवत १०० टक्के निकालाची नोंद केली आहे. या घवघवीत यशामुळे शाळेच्या नावलौकिकात भर पडली आहे. शाळेतील रणसिंग विराज दीपक याने ९८.८० टक्के गुण मिळवून शाळेत प्रथम क्रमांक पटकावला. पालवे अस्मिता प्रकाश हिने ९७ टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक, तर पाडळे तन्मय प्रदीप याने ९६.८० टक्के गुणांसह तृतीय क्रमांक पटकावला.

चतुर्थ क्रमांकावर त्रिंबके श्वेता अण्णासाहेब ९५.२० टक्के आणि शिनगारे पुष्कर सचिन ९५ टक्के यांची नावे झळकली.शाळेतील एकूण निकाल पाहता ११ विद्यार्थी ९० टक्के पेक्षा जास्त गुण मिळवणारे , ८० ते ९० टक्के गुण २३ विद्यार्थी ,७० ते ८० टक्के गुण ३२ विद्यार्थी, ६० ते ७० टक्के गुण २४ विद्यार्थी, ५० ते ६० टक्के गुण २८ विद्यार्थी , ४० ते ५० टक्के गुण ८ विद्यार्थी यांनी यश प्राप्त केले आहे.

या उत्तम निकालाबद्दल आनंद एज्युकेशन सोसायटीचे सचिव किसन तरटे, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक दांगट, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका शारदा पोखरकर तसेच सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.